लोकमान्य टिळकांच्या राजकीय विचारांवर नवा प्रकाश

डॉ. अशोक चौसाळकर

आधुनिक भारताच्या इतिहासात लोकमान्य टिळक यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. म. गांधी यांचा भारतीय राजकारणात प्रवेश होण्यापूर्वी त्यांनी भारतात नव्या लोकशाही राजकारणास सुरुवांत केली. होमरुल लीगची चळवळ याच राजकारणाचा एक भाग होती. त्यांच्या काँग्रेस लोकशाही पक्षाने १९२० साली जो जाहीरनामा प्रकाशित केला त्या जाहीरनाम्यात नमूद केलेल्या मुद्दयाभोवती नंतरचे राजकारण बराच वेळ फिरत राहिलेले आपणास दिसते. यावर्षी लोकमान्य टिळक आणि त्यांचे थोर सहकारी गोपाळ गणेश आगरकर यांच्या जन्मास १५० वर्षे पूर्ण होत आहेत. एकविसाव्या शतकात लो. टिळक यांच्या योगदानाची वस्तुनिष्ठ ऐतिहासिक मीमांसा करणे अगत्याचे बनले आहे. कारण प्रत्येक पिढी आपल्या पूर्वसूरींच्या योगदानाची नव्याने दखल घेत असते. लो. टिळक यांच्या राजकीय कार्याबाबत नव्याने संशोधन करून त्याचे निष्कर्ष आपल्या समोर मांडण्याचे काम भारतातील प्रसिद्ध इतिहासकार प्रा. जे. व्ही. नाईक यांनी आपल्या "British Secret Official View Regarding Lokmanya Tilak and Geeta Rahasya" या पुस्तकात केले आहे. प्रा. नाईक यांनी या पुस्तकास विद्वत्तापूर्ण प्रस्तावना जोडली आहे.

प्रा. नाईक यांनी आतापर्यंत आधुनिक भारताच्या इतिहासावर विशेषतः १९ व्या शतकातील प. भारतातील प्रबोधन चळवळीवर मोलाचे असे संशोधन केले आहे. त्यांनी केलेल्या संशोधनामुळे परमहंस सभा दादोबा पांडुरंग, भास्कर पांडुरंग, म. जोतीराव फुले, भाऊ महाजन व प्रार्थना समाज यांच्याबाबत आपणास बरीच नवी माहिती मिळाली आणि त्यांच्या कार्याची मीमांसा करीत असताना त्यांचा उपयोग झाला. प. भारतातील धर्मसुधारणेच्या चळवळीची अनेक वैशिष्टये त्यांनी आपल्या विविध संशोधनपर लेखांतून अभ्यासकांसमोर मांडली. प्रा. नाईक यांच्या संशोधनाचे वैशिष्टय म्हणजे ते मूळ साधनांचा कसोशीने शोध घेतात. या साधनांची कठोर चिकित्सा करुन मगच ते आपले निष्कर्ष मांडतात. निष्कर्ष मांडीत असताना ऐतिहासिक परिस्थितीचे ते योग्य भान ठेवतात. प्रस्तुत पुस्तकातही प्रा. नाईक यांच्या संशोधनाची सर्व वैशिष्टये स्पष्ट होतात. या पुस्तकातील काही लेख मुंबईच्या प्रतिष्ठित अशा 'इकॉनॉमिक अँड पोलिटिकल वीकली' मध्ये प्रकाशित झाले आहेत. यातील सर्व लेख १९१४ नंतरच्या टिळकांच्या राजकारणाबाबत आहेत आणि प्रा. नाईक यांचे असे मत आहे की टिळक काळाबरोबर बदलत होते आणि त्यांच्या आयुष्याच्या शेवटच्या काळात त्यांच्यामध्ये मोठा बदल झाला होता. या पुस्तकात चार लेखांचा समावेश आहे. ते लेख म्हणजे गणपती उत्सवाबद्दल ब्रिटीश गुप्त पोलिसांचे अहवाल, मंडालेच्या तुरुंगातून सुटका झाल्यानंतर टिळकांचे राजकारण कशा प्रकारचे असेल याबाबत गुप्त पोलिसांचे अहवाल 'गीतारहस्य' या टिळकांच्या ग्रंथावर ब्रिटीशानी नियुक्त केलेल्या भाषांतरकाराचा अहवाल आणि या लेखांतील सर्वात महत्त्वाचा लेख म्हणजे 'कार्ल मार्क्स व वर्गसंघर्ष' या विषयावर लोकमान्य टिळक यांचे विचार. या पुस्तकास प्रा. नाईक यांनी अत्यंत उपयुक्त अशी परिशिष्टे जोडली आहेत. प्रा. नाईक यांनी बाँबे अर्काइव्हजं मधून ही साधने गोळा केली व त्या आधारे लेख लिहिले आहेत.

या पुस्तकास प्रा. नाईक यांनी विस्तृत

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

अनुक्रमणिका

प्रस्तावना लिहून असे प्रतिपादन केले आहे की टिळकांची राजकीय कारकीर्द म्हणजे त्यांच्या सातत्याने व्यापक होत जाणाऱ्या ध्येय दृष्टीचा इतिहास आहे. सुरुवातीपासूनच त्यांनी आपला साम्राज्यवाद विरोध कायम ठेवला कारण त्यांचे असे मत होते की साम्राज्यवाद आणि वसाहतवाद कधीच फायद्याचा असू शकत नाही. त्यांच्या विचारांत दोन महत्त्वाचे बदल झाले. त्यांचे सामाजिक विचार जास्त परिपक्व झाले व त्यांना समाजवादाबाबत आकर्षण वाटू लागले. काळाबरोबर त्यांचाही विकास होत होता.

प्रा. नाईक यांच्या मते सर्व वर्गातील लोकांना एका व्यासपीठावर आणणारा गणेशोत्सव हा टिळकांचा यशस्वी उपक्रम होता. त्यातून साम्राज्यशाहीविरोधी जनभावना प्रदीप्त करण्याचे महत्त्वाचे काम त्यांच्या हातून झाले. गोपनीय कागदपत्रांचा विशेषत: गोपनीय अहवालांचा आधार घेत प्रा. नाईक असे दाखवून देतात की या उत्सवामुळे हिंदु व मुसलमानांत वैरत्व निर्माण झाले नाही. दोन्ही समुदायातील लोक त्यांत भाग घेत. वाजंत्री वाजवणारे, सजावट करणारे कारागीर मुसलमान होते. टिळकांनी आपल्या भाषणात मुसलमानांचा पाठिंबा मिळविण्याचा प्रयत्न केला. त्यांच्याच पुढाकाराने हिंदु व मुसलमान नेत्यांच्यामध्ये १९१६ साली लखनौ करार झाला. याबाबत त्यांचा दृष्टिकोण राष्ट्रीय होता म्हणून त्यांना हिंदुत्त्वाच्या राजकारणाचा जनक समजणे योग्य होणार नाही.

लोकमान्य टिळकांची सहा वर्षांच्या कारावासातून सुटका झाल्यानंतर त्यांचे राजकारण कशा प्रकारचे असेल याबाबत पोलिसांचे मत ब्रिटिश सरकारला हवे होते कारण १९१४ नंतर १९०६-०७ साली ज्या प्रकारची सरकारच्या विरोधात उग्र अशी चळवळ टिळकांनी सुरू केली होती ती आता त्यांना पुन: सुरू करता येणार नाही असे ब्रिटीश सरकारचे मत होते पण त्याचबरोबर लोकांचे राजकीय नेतृत्त्व करण्याची अत्यंत तीव्र अशी इच्छा त्यांच्या मनात वसत असल्यामुळे ते गप्प बसणार नाहीत याची ब्रिटिशांना खात्री वाटत होती. त्याबाबत गोपनीय कागदपत्रे असे सांगतात की लोकमान्य टिळकांना तीव्र राजकीय भान असल्यामुळे ते वापस आल्यावर गप्प बसणार नाहीत तर त्यांच्या तुरुंगवासाच्या काळात सुप्तावस्थेत असलेली राष्ट्रीय चळवळ पुनरुज्जीवित करण्याचा ते प्रयत्न करतील. त्यांची यापुढची पावले सावध असतील पण सरकारविरोधी भावना सतत पेटवण्याचे काम ते या ना त्या मार्गाने चालूच ठेवतील. गोपनीय कागदपत्रात वर्तवलेला अंदाज बरोबर ठरला. टिळकांनी काँग्रेसमध्ये ऐक्य स्थापना झाल्यानंतर हिंदु व मुसलमान यांच्या पुढाऱ्यांना एकत्र आणून लखनौ करार केला. या कराराचे वैशिष्टय असे की तिसऱ्या पक्षाचा हस्तक्षेप होऊ न देता हा करार झाला आणि नंतर वीस वर्षे या कराराच्या चौकटीतच हिंदु व मुसलमान यांच्यात चर्चा झाली. दुसरी गोष्ट म्हणजे त्यांनी डॉ. ॲनी बेझंट यांच्या सहकार्याने होमरुल लीग स्थापन करून होमरुल चळवळ सुरू केली. 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळविणारच' ही घोषणा याच काळातील आहे. एखादा राजकीय नेता कशाप्रकारे बदलत्या परिस्थितीस तोंड देतो याचे या काळातील टिळकांचे राजकारण हे उत्तम उदाहरण आहे.

लो. टिळकांनी मंडालेच्या तुरुंगात त्यांचा गीतारहस्य हा ग्रंथ लिहिला. हा ग्रंथ त्यांच्या आयुष्यभरच्या व्यासंगाचे फळ होते. या पुस्तकात त्यांनी पौर्वात्य व पाश्चात्त्य तत्त्वज्ञानांचा तौलनिक अभ्यास करून त्यांच्या संदर्भात गीतेचे कर्मयोगशास्त्र समजावून सांगण्याचा प्रयत्न केला. सांख्य, न्याय व वेदांत आणि जे. एस. मिल स्पेन्सर आणि थॉमस हिल ग्रीन यांच्या उपयुक्ततावाद, उत्क्रांतिवाद आणि चैतन्यवाद यांचा तौलनिक अभ्यास करून त्यांनी आपले निष्कर्ष मांडले. तत्त्वज्ञानाच्या विशेषत: तौलनिक तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात ही मोठी कामगिरी होती. त्यांच्यापूर्वी व त्यांच्या नंतरही या वैचारिक दर्जाचे काम झालेले नाही. असा हा ग्रंथ टिळकांना इंग्रजांनी दिला नाही कारण या ग्रंथात राजद्रोहाला उत्तेजन देणारे लिखाण असण्याची शक्यता

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

अनुक्रमणिका

त्यांना वाटत होती. क्रांतिकारकांना सशस्त्र क्रांती करण्यासाठी मानसिक प्रशिक्षण देणारे हे पुस्तक आहे असे सरकारचे मत होते. त्यामुळे या पुस्तकाचे व वेदिक क्रॉनॉलजी या पुस्तकाचे हस्तलिखित सरकारचे 'ओरिएंटल ट्रान्सलेटर' पौर्वात्य भाषांचे भाषांतरकार श्री. एस्. एम्. भरुचा यांच्याकडे त्यांच्या मतप्रदर्शनार्थ सोपविण्यात आले. भरुचा यांना संस्कृत व मराठी भाषा अवगत होत्या. श्री. भरुचा यांनी गीतारहस्याचे बारकाईने अध्ययन केले आणि अभ्यासअंती त्यांचे असे मत बनले की गीतारहस्य हे तत्त्वज्ञानावरचे विद्वत्तापूर्ण असे पुस्तक असून त्यात आक्षेपार्ह असा मजकूर नाही. प्रा. नाईक यांच्या मते भरुचांनी आपला अहवाल दोन भागात दिला असून पहिल्या भागात आपली पुस्तकाबाबतची मते सांगितली आहेत तर दुसऱ्या भागात गीतारहस्याचे प्रकरणशः सार त्यांनी सांगितले आहे.

श्री. भरुचा यांच्या मते या पुस्तकची खालील वैशिष्टये आहेत

१. गीतारहस्य हे विद्वत्तापूर्ण असे भाष्य असून गीतेवर शंकराचार्य, मध्वाचार्य, रामानुजाचार्य व वल्लभाचार्य यांच्या पारंपरिक भाष्यांपेक्षा वेगळा विचार त्यात मांडला आहे. पारंपारिक भाष्ये गीतेतील अध्यात्माबांबतचे विवेचन करतात पण लो. टिळक यांच्या मते गीता हा व्यावहारिक नीतिशास्त्रावरचा ग्रंथ आहे.

२. गीतेत जे नीतिशास्त्र श्रीकृष्णाने सांगितले आहे ते महाभारताच्या कथानकाच्या संदर्भात आपण समजावून घेतले पाहिजे. त्या शिकवणुकीस युद्धाची पार्श्वभूमी आहे. त्यामुळे गीता वेदांतातील निवृत्तीवाद शिकवीत नाही तर ती सकारात्मक वृत्तीचा पुरस्कार करते, कर्मयोगाचे समर्थन करते.

३. टिळकांच्या मते गीता कर्मयोगाची शिकवण देते. माणसाने आपले कर्तव्य निष्फळ बुद्धीने व कोणत्याही प्रकारच्या फळाची आकांक्षा न धरता करावे. मात्र आपले कर्तव्य बजावत असताना पूर्ण ज्ञान प्राप्त करून घ्यावे कारण असे ज्ञान प्राप्त करून घेतल्याशिवाय त्यास निष्काम वृत्तीने व स्थितप्रज्ञ बुद्धीने काम करता येत नाही. भरुचा यांच्या मते गीतारहस्यात टिळकांनी हा सिद्धांत मांडला आहे.

आपल्या अहवालात भरुचांनी गीतारहस्यातील काही परिच्छेद आक्षेपार्ह असल्याचे सांगितले आहे पण त्यांचे असे मत होते की सर्वसाधारणपणे विचार करता पुस्तकात राजकीय दृष्टया फारसा आक्षेपार्ह मजकूर नाही म्हणून या पुस्तकाचे हस्तलिखित लेखकास परत करावयास हरकत नाही. भरुचा यांच्या अहवालानंतर गीतारहस्याचे हस्तलिखित टिळकांना देण्यात आले. मुळात शिसपेंसिलीने लिहिलेल्या हस्तलिखिताची प्रेस कॉपी तयार करून मग ते प्रकाशित करण्यात आले. आपले काम चोख आणि निःपक्षपातीपणाने बजावल्याबद्दल प्रा. नाईक यांनी श्री. भरुचा यांची स्तुती केली आहे.

म. गांधींचे गीतेवरचे विवेचन टिळकांपेक्षा वेगळे असले तरी त्यांनी गीतारहस्याचे मोठेपण मान्य केले. त्यांच्या मते त्यांचे गीताभाष्य त्यांची स्मृती आपणांमध्ये दीर्घकाळपर्यंत कायम ठेवील. आपणास स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही तिचे महत्त्व कायम राहील. मानवी समाजापुढे निर्माण झालेल्या प्रश्नांचे विवेचन या पुस्तकात त्यांनी केले आहे. आपणास असे म्हणता येईल की आजही टिळकांच्या या कामाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे कारण त्यांनी पौर्वात्य व पाश्चिमात्त्य तत्त्वज्ञानांचे तुलनात्मक अध्ययन करून त्यांनी स्वतःचे असे निष्कर्ष प्रतिपादित केले. भारतातील निष्काम कर्मयोगाचे नीतिशास्त्र हे मिलच्या उपयुक्ततावादी नीतिशास्त्रापेक्षा किंवा गीतेच्या आदर्शवादी नीतिशास्त्रापेक्षा श्रेष्ठ होते हे त्यांचे मत आपण मान्य केले नाही तरी मागास देशातील एका विचारवंताचे व नेत्याचे याबाबतचे बौद्धिक धाडस आणि गंभीर सिद्धांतन करण्याची ताकद चकीत करणारी होती हे मान्य करावे लागते.

या पुस्कातील सर्वात महत्त्वाचा लेख टिळक व समाजवाद या विषयावरचा आहे. प्रा. नाईक यांच्या

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

मते आपण टिळकांचा अभ्यास करीत असताना मुख्य भर 'केसरी' वर देतो आणि 'मराठा' या इंग्रजी साप्ताहिंकाकडे दुर्लक्ष करतो. त्यामुळे यातील लिखाण दुर्लक्षिले गेले. पण १८८१ मध्येच टिळक 'मराठा'चे संपादक असताना अराज्यवाद व समाजवाद या विषयावरचे परदेशातील नियतकालिकात छापलेले लेख ते आपल्या वाचकांसाठी पुनः छापत असत. त्यामागचा उद्देश नवे विचार लोकांना कळावेत हा होता. जाने १८८१ मध्ये 'मराठा'त त्यांनी Nihilism या विषयावर लेख प्रकाशित केला होता. यात मुख्यतः रशियन अराज्यवाद्यांच्या विचारांचा परामर्श घेण्यात आला होता. अलेक्झँडर हर्झन आणि मिखाएल बाकुनिन यांची नावे त्यात घेण्यात आली आहेत. प्रा. नाईक यांच्या मते शेतकरी व कामगार यांच्या समस्यांबद्दल टिळकांच्या मनात आस्था होती व 'केसरी'त त्यांनी त्यांच्यावर अनेकदा लिहिले होते. अराज्यवाद राजकारणात लढावू आणि परिवर्तनशील धोरण, समाजकारणात साम्यवादाची भूमिका आणि धर्मविषयात ईश्वरवादाची भूमिका स्वीकारतो. रशियन राजेशाहीचे रशियन निहिलिस्ट मोठे विरोधक होते. हर्झन व बाकुनिनसारखे क्रांतिकारक निहिलिझमूचे पुरस्कर्ते होते.

जून १८८१ मध्ये समाजवाद या विषयावरचा लेख टिळकांनी प्रकाशित केला आहे. त्या लेखात मार्क्सचे श्रमाविषयीचे व वर्गसंघर्षाविषयीचे विचार कशा प्रकारचे होते याचे विवेचन करण्यात आले आहे. या निबंधाला जे प्रास्ताविक लोकमान्य टिळकांनी लिहिले ते महत्त्वाचे आहे. त्यात ते लिहतात "आपल्या संस्कृतीच्या विकासाबद्दलच्या कितीही बढाया आपण मारीत असलो तरी अजूनही खूप काम करावयाचे बाकी राहिलेले आहे. 'रॅडिकल' या नियतकालिकांतून महत्त्वाचा निबंध आम्ही प्रकाशित करीत आहोत. यात कामगारसंघांचा आपणास कशाप्रकारे उत्तम वापर करता येईल हे सांगितले आहे. आम्हास अशी खात्री वाटते की या निबंधाचे वाचन केल्यानंतर आपल्या मनात उपयुक्त आणि अपेक्षित अशी विचारक्रांती होईल." या निबंधात समाजवादाच्या तत्त्वज्ञानाचे विशेषतः मार्क्सच्या तत्त्वज्ञानाचे विवेचन करण्यात आले आहे. कामगारांचे भांडवलशाही वर्गापासून कशा प्रकारे शोषण होते आणि या निर्दय शोषणामुळे समाजात वर्गसंघर्ष कसा निर्माण झाला आहे हे त्यात सांगितले आहे. कार्ल मार्क्स असे म्हणतो की समाजातील संपत्ती मानवी श्रमातून निर्माण होते पण भांडवलदारवर्ग या मानवी श्रमाची लूट करतो. ही लूट तो स्वतःच्या विलासासाठी आणि उन्नतीसाठी करतो. कामगारांच्या श्रमातून अशा प्रकारे अतिरिक्त मूल्य संपादन केल्यामुळे भांडवलदारांचा लाभ होतो पण त्यामुळे समाजात मोठ्या प्रमाणात गरीबी, बेरोजगारी आणि असंतोष वाढत जातो. सर्वसाधारण तात्पुरते कायदे करुन या परिस्थितीवर आपणास उपाय योजना करता येणार नाही. त्यासाठी आमच्या सामाजिक व राजकीय संस्थांच्या स्वरुपात मूलगामी बदल होणे गरजेचे आहे. कामगारांचे श्रम ही खरी संपत्ती असून सर्व सामाजिक व राजकीय सत्तांचा तो आधार आहे. यासाठी कामगारांच्या कामगार संघटना तयार झाल्या पाहिजेत आणि कामगार संघटनांनी भांडवलशाहीकडून कामगारांचे जे शोषण होते ते थांबविले पाहिजे.

प्रा. नाईक यांच्या मते १८८१ साली ब्रिटिश सरकारने 'फॅक्टरीज ॲक्ट' संमत केला. या कायद्याला टिळकांसह सर्वच महत्त्वाच्या राजकीय नेत्यांनी विरोध केला होता. त्या कायद्याच्या पार्श्वभूमीवर लो. टिळकांनी हा लेख 'मराठा' या आपल्या साप्ताहिकात प्रकाशित केला आहे. त्यांच्या मते लो. टिळक भारतातील राष्ट्रीय चळवळीतील साम्राज्यशाहीविरोधी चळवळीतील लोकप्रिय नेते होते व त्यामुळे जगभर त्यांच्याबद्दल एक प्रकारची उत्सुकता होती. त्यामुळे १९०८ साली ज्यावेळी लो. टिळकांना सहा वर्षे कारावासाची शिक्षा झाली त्यावेळी मुंबईच्या कामगारांनी त्यास संप करून विरोध दर्शविला. त्यावेळी लेनिनने कामगारांच्या या राजकीय कृतीचे समर्थन केले होते. रशियात ऑक्टो. १९१७ साली समाजवादी क्रांती झाली. या क्रांतीचे टिळकांनी स्वागत केले आणि

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

जानेवारी १९१८ च्या 'केसरी' मध्ये रशियन क्रांतीचे समर्थन केले आणि या क्रांतीचा नेता लेनिन याच्या नेतृत्त्वाचे त्यांनी कौतुक केले. त्यानंतर त्यांनी समाजवादी चळवळीतील नेत्यांशी संबंध वाढविले. इंग्लंडला त्यांनी कामगारांच्या काही सभांत भाषणे केली व त्यातील एका सभेचे अध्यक्षपद थोर साहित्यिक व फेबियन समाजवादाचे पुरस्कर्ते जॉर्ज बर्नार्ड शॉ यांनी भूषविले होते. या काळात त्यांनी ब्रिटिश मजूरपक्षाशी जवळचे संबंध प्रस्थापित केले कारण त्यांच्या हे लक्षात आले होते की उद्याच्या राजकारणात मजूरपक्षाशी जवळचे संबंध ठेवणे भारतासाठी गरजेचे आहे. त्यावेळी मजूरपक्ष साम्राज्यवादी धोरणास विरोध करीत होता. प्रा. नाईक सांगतात की त्या काळात इंग्लंडमध्ये शापूरजी सकलातवाला हे मजूरपक्षाचे खासदार होते व भारतात मजूरपक्ष स्थापन करण्यात लोकमान्य टिळकांनी पुढाकार घ्यावा असे त्यांचे मत होते. ते स्वतःला जहाल टिळकवादी मानत असत. भारतीय कम्युनिस्ट चळवळीचे प्रमुख नेते कॉ. श्रीपाद अमृत डांगे यांनीही या मतास दुजोरा दिला होता. टिळकांच्या प्रखर साम्राज्यवादविरोधी व राष्ट्रीय जनमुक्ती आंदोलनातील त्यांच्या स्थानांमुळे त्यांच्या पुढारपणाखाली व छत्रछायेखाली कामगर चळवळ सुरू करण्याचा या डाव्या क्रांतिकारकांचा बेत त्यातून स्पष्ट दिसतो. याबाबत टिळकांनी गुलाम राष्ट्रांच्या राष्ट्रीय स्वयंनिर्णयाच्या अधिकारास पाठिंबा दिला होता.

प्रा. नाईक यांच्या या संशोधनामुळे काही महत्त्वाचीं कागदपत्रे आपणास मिळाली आहेत. या कागदपत्रांच्या व त्यांच्या विश्लेषणाच्या आधारे आपण टिळकांच्या राजकीय विचारांचे नव्याने मूल्यमापन करू शकतो. 'समग्र टिळक' वाङ्मयाच्या आठ खंडांचे संपादन करणाऱ्यांनी बरेच महत्त्वाचे संदर्भ वगळलेले दिसतात.

प्रा. नाईक यांनी असे मत व्यक्त केले आहे की काळाबरोबर टिळकांच्या विचारांत बदल होत होता. सर्वसाधारणपणे हे मत मान्य केले तरी ही गोष्ट आपण लक्षात ठेवली पाहिजे की समाजवाद व अराज्यवादावरील लेख त्यांनी अगदी १८८१ साली म्हणजे त्यांच्या राजकीय कारकीर्दीच्या सुरुवातीस प्रसिद्ध केले आहेत. या काळात ते मिल आणि स्पेंसर यांच्या प्रभावाखाली होते आणि स्वतः आगरकरांनी लिहिले आहे की त्या दोघांतील मतभेद, सुधारणा कोणत्या गतीने करावयाच्या याबाबत होता. सुधारणांबाबत नव्हता. त्यास आगरकरांचा असा आक्षेप होता की लोकांचा पाठिंबा मिळविण्यासाठी व राजकीय नेतेपद प्रस्थापित करण्यासाठी याबाबत ते बोटचेपी भूमिका घेत आहेत. याचा अर्थ असा की देशातील इतर नेत्यांप्रमाणेच टिळकांच्या भूमिका स्थिर नव्हत्या.

लोकमान्य टिळकांच्या कार्याचे मूल्यमापन करीत असताना आपणास तीन गोष्टी लक्षात घ्याव्या लागतात. टिळक भारतातील विशिष्ट अशा सरंजामशाहीने प्रभावित केलेल्या समाजात काम करीत होते आणि राजकारणात आपला पाया तयार करण्यासाठी त्यांना सातत्याने सरंजामशाहीतील काही प्रतिगामी शक्तींशी तडजोड करावी लागत होती. दुसरी गोष्ट म्हणजे देशाच्या आर्थिक विकासाची गती लक्षात घेता त्या काळात भारतातील भांडवलदार वर्ग कमजोर होता आणि त्या वर्गाचा पुरेसा पाठिंबा त्यांना नव्हता. कामगारवर्ग लहान होता. शेतकरीवर्गात अजून मोठ्या प्रमाणात जागृती व्हावयाची होती. मध्यमवर्ग काही प्रमाणात वाढत होता पण त्याचा पाया मजबूत नव्हता पण टिळकांच्या साम्राज्यशाही विरोधी चळवळीला या वर्गाचा पाठिंबा होता. तिसरी गोष्ट म्हणज या सर्व राजकारणात वसाहतवादी सरकारची भूमिका महत्त्वाची होती आणि त्यांची भूमिका चळवळ दडपून टाकण्याची होती. त्यामुळे टिळकांना तीनदा तुरुंगात टाकल्यानंतर १९१४ नंतर पुनः एकदा राजद्रोहाचा आरोप सरकारने केला होता कारण मुंबई सरकारची नोकरशाही त्यांच्या विरोधात होती.

या संदर्भात टिळकांनी समाजवादाबाबत जे मत मांडले त्याचा आपणास विचार करावा लागेल.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

याबाबतीत कामगार संघटनांचा राजकीय कार्यासाठी वापर केला पाहिजे. समाजाची प्रगती घडवून आणण्यासाठी कष्टकरी वर्गासाठी आणखी खूप करण्याची गरज आहे आणि समाजवादी विचारांचे वाचन केल्यामुळे लोकांच्या विचारात क्रांतिकारक बदल होतील अशी तीन निरीक्षणे त्यांनी नोंदवली आहेत आणि एक राजकीय पुढारी म्हणून ते किती जागरुक होते याचे दर्शन त्यातून होते. समाजवाद ही साम्राज्यशाही विरोधी चळवळ आहे व रशियन क्रांतीने त्यास सुरुवात केली आहे या अर्थाने ते त्याकडे पाहात होते. पण त्यांनी समाजवादी विचारांचा स्वीकार केला होता का? या प्रश्नाचे उत्तर नाही असे आहे कारण सुरुवातीच्या काळात ते मिल व स्पेंसर यांच्या तत्त्वज्ञानाच्या प्रभावाखाली होते. पण गीतारहस्य लिहीत असताना त्यांची भूमिका वेदांत प्रतिपादीत चैतन्यवादाच्या वा अध्यात्मवादाच्या जवळची होती. त्यात स्पेंसरचा अज्ञेयवाद दिसत नाही. मार्क्सच्या समाजवादाचा व वर्गसंघर्षाचा जरी त्यांनी उल्लेख केलेला असला तरी मार्क्सच्या द्वंद्वात्मक भौतिकवादाचा आणि निरीश्वरवादाचा सिद्धांत त्यांना मान्य झाला असता असे वाटत नाही. टिळकांना वर्णव्यवस्थेचा काळ आता संपला आहे याची जाणीव झाली होती पण त्यास पर्याय म्हणून उदय पावणाऱ्या भांडवलशाही व्यवस्थेबाबत त्यांच्या मनात शंका होती. पण वर्णव्यवस्था व भांडवलशाही यांना पर्यायी व्यवस्था समाजवादाच्या रूपाने आपणास प्राप्त करता येईल या मुद्यापर्यंत ते आले नव्हते. त्यांचा एकूण ऐतिहासिक अनुभव तोकडा होता.

१९१४ नंतर टिळकांनी जे राजकारण केले त्यात एका मर्यादेपर्यंत आंदोलनात्मक राजकारण होते आणि त्या राजकारणाचा उद्देश भारतीयांसाठी संसदीय संस्थात जास्त प्रतिनिधित्व मिळवून देणे हे होते. कारण वासाहतिक सरकारने राजकीय सहभागाचा मर्यादित अवकाश उपलब्ध करून दिला होता. त्यांचे प्रतियोगी सहकारितेचे धोरण याच संसदीय अवकाशात लागू करता येणे शक्य होते. त्यामुळे त्यांच्या कॉंग्रेस डेमॉक्रॅटिक पक्षाच्या जाहीरनाम्यात संसदीय राजकारणात हाती घ्यावयाच्या कार्यक्रमांचा समावेश करण्यात आला आहे. त्यांच्या राजकारणाचा सामाजिक पाया मर्यादित होता आणि त्यातच त्यांच्या काही चुकीच्या धोरणामुळे त्यांना द-भारतातील ब्राह्मणेतर जातीतील लोकांच्या लोकशाही आकांक्षा लक्षात आल्या नाहीत. त्यामुळे त्यांना आपल्या राजकीय चळवळीत समाविष्ट करण्यात यश आले नाही. म्हणूनच टिळकांच्या चिलखतातही काही भेगा गेल्या असे प्रा. नाईक लिहितात.

१९१४-२० या काळात भारतात समाजवादी पक्ष स्थापन करणे अवघड होते कारण येथे संघटित कामारांची संख्या कमी होती आणि लोकशाही राजकारणाचा ऐतिहासिक अनुभव अत्यंत मर्यादित होता. त्यामुळे लोकमान्यांच्या मृत्यूनंतर जवळ जवळ एक दशकानंतर पं. नेहरु, भारतीय कम्युनिस्ट पक्ष आणि कॉंग्रेस समाजवादी पक्ष यांनी या राजकारणास सुरुवात केली. कारण त्या काळातच भारतातील शेतकरी व कामगार यांच्या मनामध्ये वसाहतवादविरोधी भावना तीव्र स्वरूपात व्यक्त झालेल्या आपणास दिसतात. १९३० मध्येच कामगारांचे मोठमोठे संप आणि किसान सभांच्या व्यापक चळवळी सुरू झाल्या होत्या. अशा प्रकारच्या चळवळ असहकाराच्या चळवळीनंतर सुरू झाल्या. लोकमान्यांचे प्रयत्न होते वसाहतवादविरोधी लढा संघटित करण्याचे. त्यांनी बोलशेव्हिकांच्या राजकारणाची केलेली स्तुती व मजूर पक्षाशी त्यांनी केलेली मैत्री त्यांच्या तीव्र ऐतिहासिक भानाचे निदर्शक आहेत मात्र समाजवादी राजकारण सुरू करण्याची त्यांची इच्छा होती असे आपणास उपलब्ध पुराव्याच्या आधारे म्हणता येत नाही. मात्र त्यांना समाजवाद्यांना त्यांच्यासारखा सर्वमान्य नेता हवा होता म्हणून त्यांच्या मृत्यूनंतर त्यांनी लाला लजपत राय यांचा पाठिंबा मिळविला होता.

प्रा. जे. व्ही. नाईक यांच्या संशोधनामुळे लोकमान्य टिळक यांचे राजकारण व राजकीय विचार

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

यांच्याबाबत नवी माहिती मिळाली. भारतात समाजवाद व कार्ल मार्क्स यांचा विचार प्रथमतः टिळकांनी मांडला ही गोष्ट त्यांनी पुराव्याने सिद्ध केली आणि आता कम्युनिस्ट पक्षाच्या इतिहासाची साधने प्रसिद्ध करण्याचे काम सुरू आहे. त्याचे संपादक आणि ज्येष्ठ कम्युनिस्ट नेते हरचरणसिंग सुरजित यांनी सुद्धा ही गोष्ट मान्य केली आहे. समाजवादाचे तत्त्वज्ञान व कामगार संघटनांची राजकीय भूमिका महत्त्वाची आहे आणि समाजात समानता स्थापन करण्यासाठी आणखी बऱ्याच गोष्टी आपणास करावयाच्या आहेत याचे भान लो. टिळकांना १८८१-८२ सालीच आले होते हे प्रा. नाईक यांनी दाखवून दिले आहे. या छोटेखानी पुस्तकास प्रा. नाईक यांनी अनेक परिशिष्टे जोडली असून त्यांचा अभ्यासकांना मोठा उपयोग होणार आहे. त्यात श्री. भरुचा यांचा 'गीतारहस्या'वरचा अहवाल पण आहे. या पुस्तकाचे मराठी भाषांतर प्रकाशित होणे गरजेचे आहे असे वाटते.

Naik J.V. British Secret Official View on Lokmanya Tilak and Geeta Rahasya. Lokmanya Tilak Trust, Pune 2005 Days - 206, Price - Rs.150

राज्यशास्त्र विभाग
शिवाजी विद्यापीठ
कोल्हापूर

दुसरी संवर्धित आवृत्ती विक्रीस उपलब्ध

हिंदू धार्मिक परंपरा आणि सामाजिक परिवर्तन

मे. पुं. रेगे

भारतातील नवसमाज उभारणीचे ध्येय साधण्यासाठी आधारभूत होऊशकणाऱ्या भारतीय नैतिक - आध्यात्मिक परंपरेचे सुबोध दिग्दर्शन करणाऱ्या ग्रंथाच्या या संवर्धित आवृत्तीत प्रा. शि. स. अंतरकर आणि प्रा. स. ह. देशपांडे यांचे परीक्षण लेख, प्रा. मे. पुं. रेगे यांनी प्रा. अंतरकर यांच्या परीक्षणाचा घेतलेला परामर्श आणि प्रा. स. ह. देशपांडे यांच्या परीक्षणाचा प्रा. रेगे यांच्या विचारव्यूहाच्या संदर्भात श्री. वसंतराव पळशीकर यांनी केलेला उहापोह या नवीन मजकुराचा समावेश आहे. सद्य स्थितीत अत्यंत प्रस्तुत असलेला हा ग्रंथ आपल्या संग्रही हवाच.

पृष्ठे २१५ किंमत रु. १६०/-

संपर्क : चिटणीस, प्राज्ञपाठशाळा मंडळ, ३१५, गंगापुरी, वाई ४१२ ८०३ (जि.सातारा)

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई